ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

PERIODIC TEST – 1 (2023 – 24) Date: 21/07/23

M.M: 40 Class IX Marathi Time: 90Min

Marathi- Aksharbharti(L-2,3,4,5,RR)

प्रश्न क्र. 1 पुढील अपठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

व्हेनिस हे इटलीतील एक समुद्रावरील कालव्यांचे व शेकडो बेटांचे प्रमुख छोटे शहर आहे. त्याचे नैसर्गिक सौंदर्य एखाद्या कलेसारखे दिसते, हे शहर एक सांस्कृतिक आणि पर्यटन केंद्र आहे. गोंडोला बोटींवर स्वार होऊन पर्यटक शहरात फिरतात.

व्हेनिसमधील पर्यटकांमध्ये रोमांचकारी रागट्टा खेळ अत्यंत लोकप्रिय आहे. ग्रँट कॅनॉलमधील या गेममध्ये हजारो लोक सहभागी होतात. यावेळी बोटींवर रंगीबेरंगी पेहरावातील लोकांच्या नौकानयनाच्या स्पर्धा असतात; चित्रकारीता, बोटींवरील ऑर्केस्ट्राने सप्टेंबर महिना पर्यटकांना येथे आकर्षित करतो. या प्रसंगी रंगमंचावरील नाटकात कलाकार मास्क घालून नाट्य सादर करतात. यावेळी येथे प्रेक्षकांमध्ये उत्साह आणि टाळ्याचा प्रतिध्वनी दूरदूरपर्यंत ऐकू येतो. व्हेनिसच्या इतिहास आणि संस्कृतीने परिपूर्ण कार्निव्हलचे विविध रंग व्हेनिसमध्ये नेहमीच दिसतात.

अकॅडेमिया गॅलरी दालन व्हेनिसमधील प्रसिद्ध संग्रहालयांपैकी एक आहे. व्हेनिसची अठराव्या शतकातील चित्रे येथे प्रदर्शित केली आहेत. स्थानिक लोक ख्रिश्चन धर्माचे पालन करतात आणि चर्चमध्ये देवाची पूजा करतात. धार्मिक सणांच्या वेळी चर्चमध्ये भाविकांची गर्दी असते. मार्बल चर्च किंवा सांता मारिया व्हेनिसमध्ये आहे. कारागिरांनी ते अतिशय सुंदर पद्धतीने सजवले आहे. व्हेनिसच्या प्रसिद्ध बंदरांपैकी एक म्हणजे व्हेनिसियन आर्सेनल. प्राचीन काळी व्हेनिस हे नौदलाचे केंद्र होते.

आवडत्या पदार्थांपैकी मुख्य पिझ्झा आणि पास्ता इथे मिळतात. मांसाहारी पदार्थांसाठी विविध प्रकारचे अन्न आणि सूप उपलब्ध आहेत. जर तुम्ही इथे स्थानिक खाद्यपदार्थ शोधत असाल तर तुम्ही शहरातील प्रसिद्ध रस्त्यांवर असलेल्या दुकानांमध्ये सजवलेल्या मोहक पदार्थांचा आस्वाद घेऊ शकता. बोलल्या जाणाऱ्या मुख्य भाषा व्हेनेशियन आणि स्पॅनिश आहेत. नोव्हेंबर ते जानेवारी पर्यंत येथील हवामान सामान्य आहे आणि भेट देण्यासाठी योग्य आहे.

1) व्हेनिस शहरात पर्यटक कशावर स्वार होऊन ग्रँड कॅनॉलमध्ये फिरतात?
   a) गोंडोला बोट b) टॅक्सी c) मेट्रो ट्रेन d) वॉटर बाईक
2) व्हेनिस शहरातील सणांमधील नाटकांचे वैशिष्ट्य कोणते? a) व्हेनिसी नृत्य b) बोटीवरील ऑर्केस्ट्रा c) विविध मुखवटे धारण करून नाट्य करणे d) टाळ्यांच्या गजरात नाट्य करणे
3) व्हेनिस शहराची मुख्य भाषा ......... a) स्पॅनिश b) व्हेनेडियन c) इंग्लिश d) फ्रेंच
4) रागट्टाची वैशिष्ट्ये सांगा.
   a) नौकानयन स्पर्धा b) बोटीवरील आर्केस्ट्रा c) मास्क घालून नाट्य करणे d) वरीलपैकी सर्व
5) व्हेनिस येथील स्थानिक लोक कोणत्या धर्माचे पालन करतात?
   a) मुस्लिम b) ख्रिश्चन c) हिंदू d) पर्शियन
6) प्राचीन काळी व्हेनिस हे शहर कशाचे केंद्र होते?
   a) पर्यटनाचे b) नौदलाचे c) बोटींच्या स्पर्धांचे d) कलाकृतींचे

प्रश्न क्र. 2 पुढील कविता वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

संत कृपा झाली। इमारत फळा आली।।<br>
ज्ञानदेवी रचिला पाया। उभारिले देवालया।।<br>
नामा तयाचा किंकर। तेणे रचले ते आवार।।<br>
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत।।

1) वरील काव्याचा प्रकार सांगून त्याच्या कवीचे नाव सांगा.

2) ज्ञानदेवांनी पाया रचला म्हणजे कोणते विशेष काम केले?

3) संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा भागवत धर्माचा प्रचार कुठपर्यंत केला आहे?

4)एकनाथ महाराजांचे गुरु कोण?

5) वरील काव्य लिहिण्याचा कवीचा उद्देश कोणता असावा?

प्रश्न क्र. 3 पुढील पठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

तिसरी घंटा घणघणली व बाहेरचा संमिश्र कोलाहल बंद पडला. उगीचच इकडून तिकडे वळणाऱ्या माना स्टेजच्या दिशेकडे स्थिर झाल्या. लोकांचे लक्ष आता आपल्याकडे आहे, याची खात्री वाटताच मी गंभीर आवाजात बोलायला सुरुवात केली, ''सभ्य स्त्री–पुरुषहो, माझ्या वादनविद्यालयाचा हा पहिलाच जाहीर कार्यक्रम आहे. आपल्या चरणी ही कला सादर करताना मला अतिशय आनंद वाटत आहे. आपण शांतपणाने या सर्व कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, अशी आपल्याला नम्र विनंती करून, मी कार्यक्रमाला सुरुवात करतो. आजच्या कार्यक्रमाची सुरुवात 'शिरीष भागवत' याच्या फिड्लवादनाने होईल. हा विद्यार्थी माझ्या विद्यालयात नुकताच शिकायला आला आहे. कलेच्या प्रांतातील हा नवखा मुसाफिर आहे, हे लक्षात घेऊन आपण त्याच्या हुशारीचे कौतुक करावे, ही विनंती!'' एवढे बोलून मी शिरीषकडे पाहिले. मला या मुलाची अतिशय भीती वाटत होती. खरे सांगायचे म्हणजे, माझ्या मनातून मला शिरीषला कार्यक्रम द्यायचाच नव्हता, कारण नुकताच शिकायला लागलेला हा विद्यार्थी माझ्या विद्यालयाचे नाव खराब करील याची मला खात्री होती, म्हणूनच मी त्याला कार्यक्रम देण्याचे टाळत होतो!

1)वरील उतारा कोणत्या पाठातील असून त्याचे लेखक कोण आहेत?

2)स्टेजवर पहिला कार्यक्रम कोणाचा होता?

3) पहिल्या कार्यक्रमात कोणते वाद्य वाजवले जाणार होते?

4) कलेच्या प्रांतातील नवखा मुसाफिर असे लेखक कोणाला म्हणतात?

5) शिरीष ला कार्यक्रम द्यायचं त्याचे शिक्षक का टाळत होते?

प्रश्न क्र. 4 कंसातील सूचनेप्रमाणे बदलून लिहा. (कोणतेही दहा) 10

1. समानार्थी लिहा- हात , झाड , शेवट , वारा (कोणतेही दोन)
2. विरूद्धार्थी करा- मित्र, सुखी , यश , उपस्थित (कोणतेही दोन)
3. लिंग बदला- सिंह ,शेतकरी, विद्वान, स्त्रिया (कोणतेही दोन)
4. वचन बदला- पुस्तक, दगड, चकली ,बिछाना (कोणतेही दोन)
5. गैरहजर - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
6. भाजीपाला या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा
7. सप्ताह - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
8. क्रियापद ओळखा- शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली.
9. क्रियाविशेषण अव्यय ओळखा- अलिकडे मुलीच सर्व क्षेत्रात पुढे असतात.
10. केवलप्रयोगी अव्यय शोधा- छे ! तुमचे तर काहीतरीच असते.
11. विशेषण ओळखा- हिवाळ्यात आमच्याकडे कडाक्याची थंडी पडते.
12. वर्तमानकाळ करा - उद्या आपली परीक्षा असेल.
13. काळ ओळखा- रामाने ते शिवधनुष्य उचलले.
14. वाक्याचा प्रकार ओळखा - शिक्षकांनी मुलांना नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे.
15. उदगारवाचक करा- पुनर्निर्माणानंतर सीएसएमटी स्थानक खूप सुंदर दिसेल.

प्रश्न क्र. 5 अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) 2

1)शिरीषची संगीत विद्यालयात कोणाबरोबर जात असे?

2) कोणती लालूच दाखवून पहिल्या आगगाडीत लोकांना बसायचा डंका वाजवला?

3) शिरीषला कार्यक्रमात कोणी साथ दिली?

आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही दोन ) 2

1) भारतात सर्वात पहिली रेल्वे मुंबईहून ........ येथे पोहोचली.

2) जी आय पी रेल्वे म्हणजे........

3)शिरीष भागवतचे वडिल अपघाताने बहिरे होण्यापूर्वी उत्तम......... होते.

इ) प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणताही एक) 2

1) शिरीषची जिद्द तुमच्या शब्दात लिहा?

2) पुण्याला जाण्याचा प्रवास कसा होता?

प्रश्न क्र. 6) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) 2

1) तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदाय रुपी इमारतीस कोणते सहाय्य केले?

2)भुकेले बाळ कोणाची वाट बघत आहे?

3)व्यायामे होय अग्निदीपन याचा अर्थ काय?

आ ) रिकाम्या जागा भरा. (कोणताही एक) 1

1) संत कृपा झाली।.......... फळा आली।।

2) व्यायामाविण सात्विक भोजन। तेही मारी........होऊन।।

इ ) खालील काव्य ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतीही एक) 2

1)व्यायाम आरोग्यदायी मित्र। हे ध्यानी ठेवावे सूत्र।।

2)तुका म्हणे मज लागलीसे भूक। धावूनी श्रीमुख दावी देवा।।

3) ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।

प्रश्न क्र. 7) पुढील कोणत्याही दोन प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा 2

1)पॉटर टॅक्सी म्हणजे काय?

2)व्हेनिसमध्ये पूर आला आहे असे मुनीम का म्हणाला?

3)न्यूयॉर्क, मुंबई, हॉगकॉग अशा शहरापेक्षा व्हेनिस हे शहर वेगळे का आहे?

4)ग्रँड कॅनॉल कोणत्या देशात आहे?

प्रश्न क्र. 8) खालील मुद्दे लक्षात घेऊन कोणतीही एक कथा पूर्ण करा. 5

1)शिंप्याचे दुकान- रोज एक हत्ती दुकानासमोर नदीकडे- दुकानापाशी थांबतो- शिंपी खाऊ देतो- एक दिवस शिंपी गंमत करतो- सोंडेला सुई टोचतो- हत्ती नदी जवळचे घाणेरडे पाणी सोंडेत भरून घेतो- शिंप्याच्या दुकानात फवारा- तात्पर्य

2)सूर्य व वारा यांचे भांडण- श्रेष्ठ कोण? - रस्त्याने जाणारा माणूस- सूर्य वारा यांच्यात पैज- माणसाला अंगावरचा कोट काढायला लावणे- सोसाट्याचा वारा- सूर्य खूप तापतो- सूर्य पैज जिंकतो- तात्पर्य

xxxxxxxx